Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NBA NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 06/10/2025**

# Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या वाटच्या, आतल्या वाटच्या... आपलं महानगर My महानगर www.mymahanagar.com

## दिनविशेष



### प्रख्यात रसायनशास्त्रज्ञ डॉ. हरी जीवन अर्णीकर

प्रा.हरी जीवन अर्णीकर यांची बनारस हिंदू विद्यापीठ आणि पुणे विद्यापीठातील रसायनशास्त्राचे ज्येष्ठ अध्यापक, अण्वीय रसायनशास्त्रातील एक अग्रगण्य संशोधक आणि प्रभावी वक्ते अशी ओळख आहे. युनेस्कोच्या एका शैक्षणिक प्रकल्पात आंतरराष्ट्रीय सल्लागार म्हणून त्यांची नियुक्ती झाली होती. प्रा. अर्णीकर यांचा जन्म आंध्र प्रदेशातील श्रीकाळहस्ती या गावी ६ ऑक्टोबर १९१२ रोजी झाला. ते सात वर्षांचे होते तेव्हा त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यांच्या आत्याने त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. मदनपल्लीच्या बेझंट थिऑसॉफिकल महाविद्यालयाचे प्राचार्य चिंतामणी त्रिलोकेकर यांनी अर्णीकरांचे गुण आणि बुद्धी लक्षात घेऊन त्यांची बनारस हिंदू विद्यापीठात पुढील शिक्षणाची सोय करून दिली. तेथे बी.एस्सी. आणि एम.एस्सी. या दोन्ही पदव्या त्यांनी पहिल्या श्रेणीत, पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण होऊन डॉक्टरेट पदवीसाठी संशोधन सुरू केले.

अर्णीकर यांना प्रा. श्रीधर सर्वोत्तम जोशी यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रबंधाचे शीर्षक होते, 'कोरोना प्रेशर अँड दी जोशी इफेक्ट इन गॅसेस अंडर डिस्चार्ज.' त्यांचा प्रबंध सातशे पृष्ठांचा होता. तीन परदेशी प्राध्यापकांनी त्याची प्रशंसा केली होती. १९५५ साली त्यांना भारत सरकारची 'ओव्हरसीज मॉडिफाइड स्कॉलरशिप' मिळाली. त्यानुसार ते पॅरिसमधील मेरी क्यूरी यांनी स्थापन केलेल्या प्रयोगशाळेत रुजू झाले. तेथे त्यांना प्रा. फ्रेडरिक जुलिएट क्यूरी आणि प्रा. इरेन क्यूरी या नोबेल मानकरी असलेल्या पति-पत्नीबरोबर संशोधन करण्याची संधी मिळाली. 'सेपरेशन ऑफ आयसोटोप बाय इलेक्ट्रोमायग्रेशन इन फ्युज्ड सॉल्ट्स' हा प्रबंध त्यांनी तेथे लिहिला. पॅरिस विद्यापीठाने त्यांच्या प्रबंधाचे मूल्यमापन करून त्यांना 'डॉक्टरेट ऑफ सायन्स' ही पदवी दिली. १९५८ साली ते बनारस हिंदू विद्यापीठामध्ये प्रपाठक म्हणून रुजू झाले. या ठिकाणी त्यांनी अणुरसायनशास्त्र विभागाची उभारणी केली. प्रा. हरी जीवन अर्णीकर यांचे पुणे येथे २२ नोव्हेंबर २००० रोजी निधन झाले.

Nashik Edition
Oct 06, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401